दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

लोकनेता
गुलाबराव पाटील वाढदिवस विशेषांक!

। शुक्रवार, दि. ५ जून २०२६ । वर्ष १ । अंक ६१ । पाने २। DIGITAL EDITION

## शिवसेना शिंदे गटाच्या रेश्मा काळे मैदानात, भाजपचे वाढले टेन्शन!

# जळगाव विधान परिषदेत शिवसेनेची बंडखोरी!

### माघारीनंतर चौरंगी लढत निश्चित; महाजन, तायडे, चौधरी आणि काळे यांच्यात रंगणार प्रतिष्ठेची निवडणूक

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव : जळगाव स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत अखेर चौरंगी लढतीचे चित्र स्पष्ट झाले असून शिवसेना शिंदे गटाच्या नगरसेविका रेश्मा कुंदन काळे यांनी उमेदवारी कायम ठेवल्याने राजकीय समीकरणांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. त्यांच्या बंडखोरीमुळे महायुतीच्या मतविभाजनाची शक्यता निर्माण झाली असून भाजप उमेदवार नंदकिशोर महाजन यांच्यासाठी ही निवडणूक अपेक्षेपेक्षा अधिक आव्हानात्मक ठरण्याची चिन्हे आहेत.**

उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. एकूण १६ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी १२ उमेदवारांनी माघार घेतल्याने आता निवडणुकीच्या मैदानात चार उमेदवार शिल्लक राहिले आहेत. भाजपकडून नंदकिशोर महाजन, महाविकास आघाडीकडून शरद तायडे, अपक्ष म्हणून अनिल चौधरी आणि शिवसेना शिंदे गटाच्या बंडखोर उमेदवार रेश्मा काळे यांच्यात थेट सामना रंगणार आहे. या निवडणुकीची चर्चा सुरू झाली ती भुसावळचे माजी नगराध्यक्ष अनिल चौधरी यांनी सर्वप्रथम



उमेदवारी जाहीर केल्यानंतर. त्यानंतर महाविकास आघाडीने शिवसेना ठाकरे गटाचे नगरसेवक शरद तायडे यांना उमेदवारी दिली. भाजपने अर्ज भरण्याच्या आदल्या दिवशी रात्री नंदकिशोर महाजन यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. त्याचवेळी शिवसेनेच्या नगरसेविका रेश्मा काळे यांनीही अर्ज दाखल करून निवडणुकीत रंगत आणली. माघारीच्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेससह अनेक अपक्ष उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. शिवसेना शिंदे गटाचे दीपक धांडे यांनीदेखील माघार घेतली. मात्र रेश्मा काळे या जिल्हाधिकारी कार्यालयातच न आल्याने त्यांचा अर्ज कायम राहिला. दुपारी तीन वाजेपर्यंत त्यांनी माघार न घेतल्यामुळे निवडणुकीत चौरंगी लढत निश्चित झाली. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. एकूण १६ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते.रेश्मा काळे यांच्या उमेदवारीमुळे सर्वाधिक उत्सुकता निर्माण झाली आहे. त्यांचा अर्ज भरताना शिवसेना महिला जिल्हाप्रमुख सरिता माळी-कोल्हे यांची उपस्थिती चर्चेचा विषय ठरली होती. गेल्या दोन दिवसांपासून रेश्मा काळे संपर्काबाहेर असल्याच्या चर्चा सुरू असतानाच त्या आणि काही शिवसेना पदाधिकारी सप्तश्रृंगी देवीच्या दर्शनासाठी गेल्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाच्या मतांची भूमिका निर्णायक ठरणार असल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. मुक्ताईनगर, चोपडा, पाचोरा, भडगाव, पारोळा, धरणगाव तसेच जळगाव महानगरपालिकेतील मोठ्या प्रमाणातील नगरसेवकांवर शिंदे गटाचा प्रभाव आहे. त्यामुळे हे मतदार महायुतीचे अधिकृत उमेदवार नंदकिशोर महाजन यांच्या बाजूने उभे राहणार की रेश्मा काळे यांच्या बंडखोरीला पाठिंबा देणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. निवडणुकीच्या रिंगणात चार प्रमुख चेहरे निवडणुकीच्या रिंगणात आता चार प्रमुख चेहरे उरले असून प्रत्येक उमेदवार आपल्या विजयासाठी जोरदार रणनीती आखत आहे. विशेषतः रेश्मा काळे यांच्या उमेदवारीमुळे निर्माण झालेल्या नव्या राजकीय समीकरणांमुळे जळगाव विधान परिषद निवडणूक राज्यातील सर्वाधिक चर्चेच्या लढतींपैकी एक ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

## Selected

### आता मागेल त्याला कृषीपंप

पुणे | सौर कृषिपंपामध्ये विश्वविक्रम करणाऱ्या महाराष्ट्राने बुधवारी (३ जून) देशात सर्वाधिक १० लाख सौर कृषिपंपांचा टप्पा पूर्ण केला. पीएम कुसुम-बी व मागेल त्याला सौर कृषिपंप अंतर्गत महाराष्ट्राने ही ऐतिहासिक कामगिरी केली आहे. देशातील एकूण सौर कृषिपंपांपैकी तब्बल ६४ टक्के सौर पंप एकट्या महाराष्ट्रात कार्यान्वित झाले आहेत. प्रधानमंत्री कुसुम-बी आणि राज्य शासनाच्या मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेची महावितरणकडून प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. देशात आतापर्यंत एकूण १५ लाख ६२ हजार २८९ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. त्यापैकी तब्बल ६४ टक्के म्हणजे १० लाख ४७२ कृषी पंपांचे एकट्या महाराष्ट्रात वाटप करण्यात आले आहे. तर उर्वरित सर्व राज्यांमध्ये ३४ टक्के म्हणजे ५ लाख ६१ हजार ८१७ कृषिपंप कार्यान्वित झाले आहेत.

## विधान परिषद निवडणुकीकडे राज्याचे लक्ष; नंदकिशोर महाजन सर्वाधिक श्रीमंत उमेदवार

### प्रतिज्ञापत्रांतून उमेदवारांच्या मालमत्ता, कर्ज आणि शैक्षणिक माहिती उघड; अनिल चौधरींकडे २.२९ कोटींची मालमत्ता

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव । प्रतिनिधी :** : राज्यातील विधान परिषद निवडणुकांची रणधुमाळी शिगेला पोहोचली असून १८ जून रोजी होणाऱ्या निवडणुकांकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज अखेरचा दिवस असल्याने विविध पक्षांमध्ये राजकीय हालचालींना वेग आला आहे. काही मतदारसंघांमध्ये बंडखोर उमेदवारांची समजूत काढण्यासाठी पक्षश्रेष्ठींची धावपळ सुरू असून उमेदवारी न मिळाल्याने अनेक ठिकाणी नाराजीचे सूर उमटताना दिसत आहेत. दरम्यान, निवडणूक आयोगाकडे दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रांमधून उमेदवारांच्या मालमत्ता, कर्ज, गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि आर्थिक स्थितीची माहिती समोर आली आहे. या माहितीनुसार भाजपचे उमेदवार नंदकिशोर महाजन हे सर्वाधिक श्रीमंत उमेदवार ठरले असून त्यांच्या नावावर तब्बल ४ कोटी ४८ लाख रुपयांची मालमत्ता आहे. प्रतिज्ञापत्रात दिलेल्या माहितीनुसार, नंदकिशोर महाजन यांच्याकडे सुमारे २ कोटी १७ लाख रुपयांची शेतजमीन असून २ कोटी ३० लाख रुपयांची जंगम मालमत्ता आहे. त्यांच्या कुटुंबाकडे जवळपास ६५० ग्रॅम सोन्याचा साठा आहे.

विशेष म्हणजे त्यांचे पुत्र प्रतीक महाजन यांच्या नावावर अमेरिकेतील सेंटेंडर बँकेत सुमारे ३४ लाख रुपयांच्या ठेवी असल्याची नोंदही करण्यात आली



आहे. महाजन यांच्या विरोधात कोणताही गुन्हा दाखल नसल्याचे प्रतिज्ञापत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. अपक्ष उमेदवार अनिल चौधरी हे मालमत्तेच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर असून त्यांच्या नावावर २ कोटी २९ लाख रुपयांची मालमत्ता आहे. भुसावळ शहरात त्यांची पाच व्यावसायिक दुकाने असून सुमारे ७० लाख रुपये किमतीचे घर आहे. तसेच २०.२५ लाख रुपये किमतीची स्कोडा ऑक्टाव्हिया ही आलिशान कार त्यांच्या मालकीची आहे. मात्र, त्यांच्यावर १ कोटी १३ लाख रुपयांचे कर्ज असल्याचेही प्रतिज्ञापत्रात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय खुनाच्या प्रयत्नाच्या प्रकरणात शिक्षा झाल्याचा तसेच काही गुन्हे न्यायप्रविष्ट असल्याचा उल्लेखही त्यांनी केला आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार शरद तायडे यांच्याकडे ४६ लाख ५२ हजार रुपयांची मालमत्ता आहे. धरणगाव तालुक्यातील शेती आणि अन्य जंगम मालमत्तेचा त्यांनी तपशील दिला आहे. विशेष म्हणजे त्यांच्या नावावर कोणतेही चारचाकी वाहन नसून कुटुंबावर कोणतेही बँक कर्ज नसल्याचे त्यांनी प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे. शिवसेना शिंदे गटाच्या बंडखोर उमेदवार रेश्मा काळे यांच्याकडे ८९ लाख ६४ हजार रुपयांची मालमत्ता आहे. जळगाव पीपल्स बँकेत त्यांच्या नावावर ३९ लाख ५१ हजार रुपयांची मुदत ठेव असून त्या पूर्णपणे कर्जमुक्त असल्याचे प्रतिज्ञापत्रातून समोर आले आहे. तर बंडखोर उमेदवार दीपक धांडे हे सर्वात कमी मालमत्ता असलेले उमेदवार ठरले आहेत. त्यांच्या नावावर कोणतीही जमीन किंवा घर नसून केवळ ५० हजार रुपयांची रोकड असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. कुटुंबाकडे सुमारे ७.५ लाख रुपयांचे सोने असल्याची माहितीही त्यांनी दिली आहे. मालमत्ता, कर्जबाजारीपणा आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी यांसारख्या बाबींची माहिती सार्वजनिक झाल्याने निवडणुकीच्या चर्चांना अधिकच उधाण आले.






दैनिक
जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
। शुक्रवार, दि. ५ जून २०२६ ।



लोकनेता

गुलाबराव पाटील
वाढदिवस विशेषांक!





## शाश्वत समृद्धीचा मार्ग आखणारे संकल्पक, पालकमंत्री गुलाबरावजी पाटील

# ४२ नालेखोलीकरण, ८९ गावांना होणार फायदा, 310 किलोमीटर पर्यंत जमीन होणार सुपीक














**मातीच्या काळजाची हाक ऐकून, प्रत्यक्ष बांधावर उतरून सुरु आहे जलसंकल्प पूर्ण करण्याचे ध्येय. धरणगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या भविष्यातील जलसमृद्धीचे नियोजन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले आहे. धरणगाव तालुक्यात जलसंधारणासाठी ३१० ते ४२५ किलोमीटरचे नाले व नदीपात्र खोलीकरणाचे व रुंदीकरणाचे महाअभियान सुरू आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरून भूजल पातळी वाढण्यास आणि दुष्काळग्रस्त भागाला मोठा दिलासा मिळण्यास मदत होणार आहे. ही योजना नाही, ही एक लोकचळवळ आहे. नाले खोलीकरण न झाल्यास व वेळीच उपाययोजना न केल्यास आपला तालुका भविष्यात ‘ डार्क झोन’ मध्ये जाण्याची शक्यता ओळखून पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी हा सकंल्प केला आहे. धरणगावचा विकास तेव्हाच होईल, जेव्हा पाणी अडविले जाईल. नालाखोलीकरणाचा हा पहिला टप्पा आहे, या नुसार जिल्हाभरात हा ‘जलसंकल्प ’ प्रकल्प राबविला जाणार आहे. हजारो कुटूंबाच्या उज्जवल भविष्यासाठी या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहनही पालकमंत्री गुलाबरावजी पाटील यांनी जनतेला केले आहे.**

जळगाव ग्रामीण मधील शेत जमिनीची सुपीकता अधिक वाढावी, यासाठी सुरु असलेल्या नालेखोलीकरण अंतर्गत ‘ जलसंकल्प‘ या प्रकल्पातील कामांची पाहणी करताना पालकमंत्री गुलाबराव पाटील सोबत जिल्हाधिकारी रोहन घुगे, शेतकरी, अभियंता व ग्रामस्थ

## विकासासाठी कटिबध्द





### कसा थांबणार दुष्काळ आणि पुराचे दुष्टचक्र

धरणगाव तालुका पारंपारिक शेतीवर अवलंबून आहे. पण आज आपण निसर्गाच्या लहरीपणात अडकलो आहोत. हे चक्र भेदण्यासाठी हा संकल्प प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न पाणीपुरवठा व स्वच्छता तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी आखला आहे. यासंकल्पास मूर्त स्वरुप देण्यासाठी ‘ जीपीएस मित्र परिवार‘यासह संपूर्ण ग्रामस्थांची मोलाची साथ लाभत आहे. पावसाळ्यात नद्या नाल्यांना येणारा पूर आणि पिकांचे नुकसान. उन्हाळा येताच आटणाऱ्या विहीरी आणि पाण्यासाठी होणारी वणवण. नदीपात्रात साचलेला गाळ आणि वाढलेल्या झुडपांमुळे कमी झालेली पाणी साठवण क्षमता यामुळे वाढणार आहे.

### नाले खोलीकरण न झाल्यास काय असेल धोका :-

वेळीच उपाययोजना न केल्यास आपला तालुका भविष्यात ‘डार्क झोन’ मध्ये जाण्याची शक्यता अधिक आहे. हे टाळण्यासाठी या प्रकल्पाला गती देण्याचे काम सुरु आहे.

### कसा आहे जळगाव ग्रामीणचा जलसंकल्प :-

या संकटावर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या संकल्पनेतून आणि सीएसआर निधीच्या माध्यमातून एख धाडसी पाऊल उचलण्यात आले आहे.

### प्रकल्पातील मुख्य कामे :-

तालुक्यातील तब्बल २१० किमी लांबीच्या नाले व नदीपात्रांचे
खोलीकरण आणि रुंदीकरण.

- पात्रात साचलेला गाळ उपसणे आणि काठ बळकटीकरण
- आस्तित्वात असलेले बंधारे आणि के.टी.आर यांची आवश्यक दुरुस्ती.

### शेतकऱ्यांना मिळणार मोफत गाळ : काय होणार शेतकऱ्यांना फायदा :-

**सुपीक जमीन :** नाल्यातून उपसलेला गाळ शेतकऱ्यांना मोफत आपल्या शेतात नेता येईल. ज्यामुळे जमिनीची सुपकता वाढेल.

**शाश्वत सिंचन :** भूर्गभातील पाणीपातळी वाढेल, ज्यामुळे खरीप आणि रब्बी दोन्ही हंगामाची हमी मिळेल.

**पूर नियंत्रण :** पावसाचे पाणी थेट शेतात न शिरता, नाल्यांद्वारे योग्य प्रकारे साठवले जाईल.
: पर्यावरण रक्षण कोणतीही मोठी बांधकामे न करता नैसर्गिक खतांचे पुनरुज्जीवन होईल.

### धोरण आणि मार्गदर्शक तत्त्वे मुख्य उद्दिष्ट :-

भूपृष्ठावर पाणी साठवण्याऐवजी (बाष्पीभवन टाळण्यासाठी) नाल्याची खोली व रुंदी वाढवून पाणी जमिनीत मुरवणे हे या धोरणाचा मुख्य उद्देश आहे.

**मर्यादा :** नाला खोलीकरणाचे काम हे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या माध्यमातून केले जात आहे. स्थानिक नियम पाळून खोलीकरण व रुंदीकरणाची कामे प्रामुख्याने दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाच्या प्रवाहावरच हाती घेतली आहेत. सद्यस्थिती आणि निधीजलयुक्त शिवार २.०: ‘जलयुक्त शिवार अभियान २.०’ अंतर्गत नाला खोलीकरण आणि रुंदीकरणाच्या कामांना राज्यभरात जळगाव जिल्ह्यात धरणगाव तालुक्यात गती देण्यात आली आहे. नवीन योजना आणि अनुदान: ‘गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार’ आणि नाला खोलीकरण या योजना कायमस्वरूपी सुरू ठेवण्यासाठी शासनाने भरीव तरतूद केली आहे.

धरणगाव तालुक्यात जलसंधारणासाठी ३१० ते ४२० किलोमीटरचे नाले व नदीपात्र खोलीकरणाचे व रुंदीकरणाचे महाअभियान सुरू आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरून भूजल पातळी वाढण्यास आणि दुष्काळग्रस्त भागाला मोठा दिलासा मिळण्यास मदत होणार आहे.

### नाले खोलीकरण प्रकल्पाची सद्यस्थिती

कामाची व्याप्ती आणि नियोजन - पाळधी-चांदसर भागापासून सुरू झालेल्या या उपक्रमात धरणगाव तालुक्यात सुमारे ३१० किलोमीटर लांबीच्या नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण केले जात आहे. यामध्ये खामखेडा ते झिरी नदीपर्यंत १० किलोमीटरचा पट्टा आणि शेरी परिसरातील ३ किलोमीटरच्या नाला खोलीकरणाचा समावेश आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कामामध्ये एकवाक्यता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवण्यासाठी ‘यश इंजिनिअरिंग कन्सल्टन्सी’मार्फत तांत्रिक सर्व्हे पूर्ण करण्यात आला आहे. नाल्यांचा नैसर्गिक उतार, पाण्याचा प्रवाह आणि त्यांची पाणी साठवण क्षमता लक्षात घेऊन हे काम नियोजित केले जात आहे.

### ३५ किलोमीटर पर्यत नाले खोलीकरण पूर्णत्वाकडे

प्रगती आणि उद्दिष्ट मोहिमेच्या पहिल्या दीड महिन्यातच ३५ किलोमीटरपेक्षा अधिक नाले खोलीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत मुरला पाहिजे या मुख्य उद्देशाने या प्रकल्पाची अंमलबजावणी होत आहे. या मोहिमेत नाला खोलीकरणासोबतच साठवण बंधाऱ्यांचे भूमिपूजन आणि शेतरस्त्यांचे लोकार्पणही करण्यात आले आहे. नालाखोलीकरण कामाची प्रत्यक्ष पाहणीही स्वत: गुलाबराव पाटील जिल्हाधिकारी रोहन घुगे व सबंधित अधिकारी, अभियंत्यांसोबत नियमित करतात. याला आधुनित तंत्रज्ञानाची जोड देत ‘ ड्रोन ‘ कॅमेऱ्यांच्या माध्यमातून ही पाहणी नुकतीच केली आहे.

**धरणगाव तालुक्यातील पूर आणि दुष्काळाचे दुष्टचक्र रोखण्यासाठी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या संकल्पनेतून ३५० किमी नदी-नाला खोलीकरणाचे महाअभियान सुरू आहे. सीएसआर निधी आणि लोकसहभागातून आकारास येणारा हा प्रकल्प तालुक्याला जलसमृद्धीकडे नेणारा ठरेल.**

### सर्वसमावेश आराखडा नेणार पूर्णत्वाकडे

उत्तर महाराष्ट्रातील या तालुक्यातील ८९ गावांचा तालुका पिढ्यानपिढ्या पारंपारिक शेतीवर अवलंबून , शेती व कष्टाचा वारसा लाभलेला हा प्रदेश. बदलत्या हवामानामुळे व भूर्गभातील पाणीपातळी घटले आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे येथील शेतकरी दोन टोकाच्या संकटात अडकले आहे. पावसाळ्यात तापी, गिरणा, अंजनी व झिरी नद्यांच्या उपखोऱ्यात नाले ओसंडून वाहतात, ज्यामुळे पुर येतो, आणि उन्हाळा येताच याच भूमीला तहान लागते. खरीप हंगाम पावसाच्या लहरीपणामुळे बारगळतो, नंतर रब्बी हंगाम घेणे देखील शाश्वत नसते. तसेच धरणगाव तालुक्यातील काही गावातील जमिनीतील पाण्याचा गावात अतिउपसा झाल्याने भविष्यात ‘डार्क झोन’ मध्ये जाण्याची भिती वाढली आहे. ३५० किलोमीटर लांबीचे नाले आणि नदीपात्र आज गाळाने भरले आहे. झाडी झुडपी, केरकचरा अतिक्रमणाने आकसले गेले आहे. यासंकटावर कायमस्वरुपी मात करण्यासाठी शेतकरी, शेती आणि माती यात रमणारे शेतकरी पुत्र जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या संकल्पनेतून त्यांनी एक सर्वसमावेश आराखडा तयार केला आहे. तांत्रिक पाहणी अंती अस लक्षात आलं की तालुक्यातील एकूण ३५० किलोमीटर पैकी तब्बल २१० किलोमीटर लांबीच्या नाले व नदीपात्राची वहन क्षमता कमालीची घटली आहे. गाळ साचल्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी थेट वाहून जाते. किंवा शेतात शिरून पीकांचे नुकसान करते. भूर्गभातील पाणी पातळी खालावल्याने तालुक्यातील विहीरे आणि बोअरवेल जानेवारीतच कोरड्या पडू लागतात. यामुळे पावसाळ्यापूर्वीच कामे वेगाने पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे.

### काय आहेत चार प्रमख उपाययोजना :-

- नाला खोलीकरण
- रूंदीकरण
- गाळ उपसा
- काठ बळकटीकरण

:( पाणी प्रवाह व्यवस्थापन ) यामुळे प्रत्येक थेंब अडविण्याचा प्रयत्न केला जाईल.
सर्व्हे अंतर्गत नाले खोलीकरण व रुंदीकरण अस्तित्वात असलेल्या जलसंधारण,बंधारे, नवीन बंधारे आणि केटीवेअर यांच्या आवश्यक दुरुस्ती गरजेनुसार करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना नालखोलीकरण रुंदीकरून यातून उपसा झालेला गाळ शेतकऱ्यांना आपल्या शेतात वाहून नेता येईल. त्यामुळे जमिनीची सुपकता वाढविता येईल. याकरिता पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी सीएसआर निधीच्या माध्यमातून धरणगाव तालुका जलसमृद्ध करण्याचा धाडसी निर्धार केला आहे. यासाठी एकूण अंदाजित ११ . ६५ कोटी रुपयांचा हा प्रकल्प वर्षभरात पूर्ण करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. यामुळे त्यांचे शाश्वत विकास व शाश्वत शेतीचे त्यांचे शेतकऱ्यांसाठीचे स्वप्न पूर्णत्वास येणार आहे. या प्रकल्पाचे परिणाम केवळ जमिनीवरच नाही, तर लोकांच्या आयुष्यावरही होतील. भुजल पुर्नभरण, पूरनियंत्रण, शेती विस्तार, पर्यावरण रक्षण. कोणतीही बांधकाम न करता नैसर्गिक स्त्रोतांचे पुर्नजीवन केल्याने पर्यावरणाचा समतोल राखला जाईल. धरणगावचा हा जलसंकल्प हा केवळ प्रकल्प नाही, तर हे एक लोकचळवळीचे स्वरुप आहे. हजारो कुटूंबाच्या भविष्याची सुरक्षा आहे, जेव्हा पाणी अडविले जाईल, तेव्हाच धरणगावचा विकास खऱ्या अर्थाने भरभराटीस येईल यात शंका नाही.



जळगाव ग्रामीण मधील शेती शिवारात सुरु असलेले नाले खोलीकरणाचे काम

दैनिक
जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33-0714843
। शुक्रवार, दि. ५ जून २०२६ ।



# अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाविरोधात एल्गार

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** शासनाकडून सुरू असलेल्या अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरण प्रक्रियेविरोधात अनुसूचित जाती प्रवर्गातील विविध समाजघटकांनी एल्गार पुकारला आहे. या पार्श्वभूमीवर अनुसूचित जातीतील ५९ जातींच्या नागरिकांची ‘एकता परिषद’ येत्या ११ जुलै रोजी धुळे शहरातील महाराणा प्रताप चौकात आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेसाठी आवश्यक जागा, मंडप व प्रशासकीय परवानग्या उपलब्ध करून द्याव्यात, परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्य शासनाच्या वतीने अनुसूचित जाती प्रवर्गातील विविध जातींच्या उपवर्गीकरणाची प्रक्रिया सुरू आहे. या निर्णयामुळे अनुसूचित जाती समाजामध्ये गंभीर चिंता, अस्वस्थता आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, समाजाच्या एकात्मतेवर त्याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. परिषदेच्या आयोजकांचे म्हणणे आहे की, उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेमुळे अनुसूचित जाती समाजात विभागणी निर्माण होण्याची शक्यता असून, सामाजिक ऐक्याला धक्का बसू शकतो. त्यामुळे समाजाची एकजूट कायम राखण्यासाठी आणि शासनाच्या प्रस्तावित प्रक्रियेविरोधात लोकशाही मार्गाने भूमिका मांडण्यासाठी या एकता परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचा वापर करत शांततापूर्ण मार्गाने समाजाच्या भावना आणि भूमिका शासनापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या परिषदेतून केला जाणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. तसेच अनुसूचित जाती समाजातील विविध घटकांमध्ये संवाद वाढवून सामाजिक ऐक्य अधिक मजबूत करण्यावर परिषदेत भर दिला जाणार आहे.

# दिव्यांगांच्या अर्थसहाय्यासाठी धरणगाव तहसीलदारांना निवेदन

## संजय गांधी निराधार योजनेतील नावे पुनर्स्थापित करून थकीत अनुदान देण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव । प्रतिनिधी : :** राज्यातील धरणगाव तालुक्यातील दिव्यांग लाभार्थ्यांचे संजय गांधी निराधार योजनेतील नावे वगळण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर ती तातडीने पुनर्स्थापित करून थकीत अर्थसहाय्य मंजूर करण्यात यावे, तसेच गरजू दिव्यांगांना अंत्योदय योजनेचा लाभ देण्यात यावा, या प्रमुख मागण्यांसाठी अपंग महासंघाच्या वतीने तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी यांना निवेदन देण्यात आले. अपंग महासंघाचे तालुकाध्यक्ष संजय पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी दिव्यांग बांधवांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात येणाऱ्या अडचणींबाबत तहसीलदारांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. निवेदनात संजय गांधी निराधार योजनेतून वगळण्यात आलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांची नावे पुन्हा समाविष्ट करून त्यांना थकीत अनुदान तातडीने मंजूर करावे, अशी मागणी करण्यात आली. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू दिव्यांग व्यक्तींना अंत्योदय योजनेचा लाभ उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याची



विनंती करण्यात आली. यावेळी तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी यांनी दिव्यांगांच्या समस्या संवेदनशीलतेने ऐकून घेत प्रशासन त्यांच्या हक्कांबाबत सकारात्मक भूमिका घेईल, असे आश्वासन दिले. “दिव्यांग बांधव हे समाजाचे अविभाज्य घटक आहेत. त्यांचा सन्मान, स्वावलंबन आणि शासकीय योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात येणाऱ्या अडचणींबाबत तहसीलदारांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. निवेदनात संजय गांधी निराधार योजनेतून वगळण्यात आलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांची नावे पुन्हा समाविष्ट करून त्यांना थकीत अनुदान तातडीने मंजूर करावे, अशी मागणी करण्यात आली. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू दिव्यांग व्यक्तींना अंत्योदय योजनेचा लाभ उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती करण्यात आली. प्रत्येक पात्र दिव्यांग व्यक्तीला त्याचा हक्क मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल,” असे त्यांनी सांगितले. निवेदन देताना अपंग महासंघाचे तालुकाध्यक्ष संजय पाटील यांच्यासह रवींद्र काबरे, रमेश चौधरी, मुकद्दर देशपांडे, बाबूलाल पटेल, भरत पाटील, गजानन महाजन आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिव्यांगांच्या प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देत लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# पाळधीला लाभले पंढरपूरचे स्वरूप; हरिनामाच्या गजराने दुमदुमली संपूर्ण पंचक्रोशी

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अभिष्टचिंतनानिमित्त अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहाची भक्तिमय सांगता

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी : :** पाळधीत चौथ्या वर्षी अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात संपन्न • ७० ते ८० नामवंत कीर्तनकार-प्रवचनकारांची उपस्थिती • जीपीएस मित्र परिवाराचे शिस्तबद्ध नियोजन ठरले आकर्षण • हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ पाळधी/धरणगाव (प्रतिनिधी) : राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अभिष्टचिंतनानिमित्त पाळधी येथे आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहाच्या चौथ्या वर्षाची गुरुवारी भक्ती, सेवा, संस्कार आणि सामाजिक एकोप्याच्या वातावरणात दिमाखदार सांगता झाली. हजारो वारकरी, संत-महंत, कीर्तनकार आणि भाविकांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण पाळधी गावाला अक्षरशः पंढरपूरचे स्वरूप प्राप्त झाले होते. सप्ताहाचा समारोप ह.भ.प. गौप्रेमी गजानन महाराज वरसाडेकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाला. टाळ-मृदुंगाचा निनाद, विठ्ठल-रखुमाईच्या जयघोषाने भारलेले वातावरण, हरिनामात तल्लीन झालेले वारकरी आणि संतविचारांनी भारलेली प्रवचने



यामुळे संपूर्ण पंचक्रोशी भक्तिरसात न्हाऊन निघाली. गावातील प्रत्येक रस्ता, चौक आणि सप्ताह परिसरातून अखंड हरिनामाचा गजर घुमत होता. "जनतेच्या आशीर्वादामुळेच जनसेवेची संधी" – गुलाबराव पाटील समारोपप्रसंगी उपस्थित भाविकांना संबोधित करताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले, "मायबाप जनतेच्या आशीर्वादामुळेच आम्हाला जनसेवेची संधी मिळाली आहे. माझ्या अभिष्टचिंतनानिमित्त आयोजित या हरिनाम सप्ताहाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून मन भारावून गेले आहे. समाजात अध्यात्म, सेवा, संस्कार आणि एकोप्याची भावना वृद्धिंगत करणारे असे उपक्रम भविष्यातही सातत्याने राबविण्याचा आमचा प्रयत्न राहील." जीपीएस मित्र परिवाराचा वारकरी साज ठरला आकर्षण या सप्ताहाचे विशेष आकर्षण ठरले ते जीपीएस मित्र परिवाराचे शिस्तबद्ध आणि संस्कारमय नियोजन. युवा नेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. जीपीएस मित्र परिवारातील १५० हून अधिक युवकांनी धोतर-कुर्ता हा पारंपरिक ड्रेस कोड स्वीकारला होता. तर सौ. ममता पाटील यांच्या मार्गदर्शनाखालील जीपीएस मैत्रिणी ग्रुपमधील सुमारे १०० महिलांनी एकसमान पारंपरिक साडी परिधान केली होती. या पारंपरिक वेशभूषेमुळे संपूर्ण परिसरात वारकरी संप्रदायाचे जिवंत चित्र अनुभवायला मिळाले.






दैनिक
सत्याचे प्राईम्स
जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
। शुक्रवार, दि. ५ जून २०२६ ।




# धुळ्यात अन्न व औषध प्रशासनाची मोठी कारवाई; 18.50 लाखांचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य साठा जप्त!

## सोनगीर पोलिसांच्या मदतीने ट्रक पकडला; चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** : | महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या गुटखा, पानमसाला आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध वाहतुकीविरोधात अन्न व औषध प्रशासन विभागाने धुळे जिल्ह्यात मोठी कारवाई करत तब्बल 18 लाख 50 हजार रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त केला आहे. या कारवाईमुळे गुटखा तस्करांमध्ये खळबळ उडाली असून अवैध व्यापार करणाऱ्यांना मोठा इशारा मिळाला आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली, सहआयुक्त (अन्न) एस. आर. करकाळे आणि सहाय्यक आयुक्त (अन्न) जी. व्ही. माहोरे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेत सोनगीर पोलीस ठाण्याचे सहकार्य लाभले. मिळालेल्या ोपनीय माहितीनुसार, एचआर-55 एई-6821 क्रमांकाच्या वाहनातून महाराष्ट्रात विक्रीसाठी मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांची वाहतूक केली जात असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली होती. त्यानुसार अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने सापळा रचून संबंधित वाहनाची तपासणी केली. तपासणीदरम्यान वाहनामध्ये विमल पान मसाला, व्ही-1 तंबाखू तसेच इतर प्रतिबंधित अन्नपदार्थांचा मोठा साठा आढळून आला. पथकाने तात्काळ कारवाई करत संपूर्ण माल जप्त केला.




जप्त करण्यात आलेल्या प्रतिबंधित अन्नपदार्थांची एकूण किंमत 18 लाख 50 हजार रुपये असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या प्रकरणी वाहन चालक सुरेशकुमार बिरबलराम गुवरिया (रा. राजस्थान) याच्याविरुद्ध सोनगीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संदर्भात एफआयआर क्रमांक 206/2026 नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 123, 223, 274, 275 तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम 2006 मधील विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रतिबंधित अन्नपदार्थांची वाहतूक, साठवणूक आणि विक्री केल्याप्रकरणी संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.अन्न व औषध प्रशासनाने सांगितले की, राज्यात गुटखा, पानमसाला आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या उत्पादन, साठवणूक, वितरण आणि विक्रीवर बंदी असून अशा प्रकारच्या अवैध व्यवसायाविरोधात विशेष मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे.

भविष्यातही अशाच धडक कारवाया सुरू राहणार असल्याचा इशाराही विभागाने दिला आहे. ही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी ए. बी. पवार, एस. बी. राणे तसेच सहाय्यक आयुक्त जी. व्ही. माहोरे यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली. अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने सापळा रचून संबंधित वाहनाची तपासणी केली. तपासणीदरम्यान वाहनामध्ये विमल पान मसाला, व्ही-1 तंबाखू तसेच इतर प्रतिबंधित अन्नपदार्थांचा मोठा साठा आढळून आला. पथकाने तात्काळ कारवाई करत संपूर्ण माल जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या प्रतिबंधित अन्नपदार्थांची एकूण किंमत 18 लाख 50 हजार रुपये असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या प्रकरणी वाहन चालक सुरेशकुमार बिरबलराम गुवरिया (रा. राजस्थान) याच्याविरुद्ध सोनगीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नाशिक विधान परिषदेत नवा ट्विस्ट; गोकुळ गीते मैदानात ठाम

जन सम्राट टाईम्स

**नाशिक । प्रतिनिधी :** नाशिक स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत माघारीच्या अखेरच्या दिवशी मोठा राजकीय ट्विस्ट पाहायला मिळाला.

महायुतीतील बंडखोरी शांत करण्यासाठी भाजपचे ज्येष्ठ नेते तथा मंत्री गिरीश महाजन यांनी केलेल्या प्रयत्नांना अंशतः यश मिळाले असले, तरी बंडखोरीचे संकट पूर्णपणे टळलेले नाही. माजी स्थायी समिती सभापती गणेश गीते यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला असला, तरी त्यांचे बंधू गोकुळ गीते यांनी निवडणुकीच्या मैदानात कायम राहण्याचा निर्णय घेतल्याने महायुतीचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांच्यासमोरील आव्हान कायम राहिले आहे.

नाशिक विधान परिषद निवडणुकीत महायुतीने नरेंद्र दराडे यांना अधिकृत उमेदवारी दिल्यानंतर काही स्थानिक नेत्यांमध्ये नाराजीची भावना निर्माण झाली होती. त्यातूनच गीते कुटुंबीयांनी अपक्ष उमेदवारीचा पर्याय स्वीकारला होता.

माघारीच्या अंतिम मुदतीपूर्वी अनेक बैठका, चर्चा आणि समन्वयाचे प्रयत्न झाल्यानंतर गणेश गीते यांनी माघार घेतली. मात्र, गोकुळ गीते यांनी आपली भूमिका कायम ठेवत निवडणूक लढवण्याचा निर्धार व्यक्त केल्याची माहिती समोर आली आहे. कोण आहेत गोकुळ गीते? गोकुळ गीते हे नाशिक जिल्ह्यातील सक्रिय युवा नेतृत्व म्हणून ओळखले जातात. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत गणेश गीते यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाकडून निवडणूक लढवली होती. त्या निवडणुकीतील प्रचाराचे संपूर्ण नियोजन आणि व्यवस्थापन गोकुळ गीते यांनीच सांभाळले होते. त्यामुळे स्थानिक राजकारणात त्यांचा प्रभाव आणि संघटन कौशल्याची चर्चा झाली होती.

गोकुळ गीते हे पिंपळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीवर सलग दोन वेळा संचालक म्हणून निवडून आले आहेत. तसेच आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सायखेडा गटातून ते सक्रिय तयारी करत असल्याचे बोलले जाते. ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांमध्ये आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींमध्ये त्यांचा प्रभाव असल्याचे मानले जाते. कथित ऑडिओ क्लिपमुळे नाराजी? गोकुळ गीते यांनी माघार न घेण्यामागे राजकीय स्वाभिमानाचे कारण असल्याची चर्चा नाशिकच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे यांचे पुत्र कुणाल दराडे यांच्या कथित ऑडिओ क्लिपमध्ये गीते यांच्या वडिलांचा एकेरी उल्लेख झाल्याचा आरोप करण्यात येत आहे.

या घटनेमुळे गीते कुटुंबीय नाराज झाल्याचे बोलले जात आहे. राजकीय चर्चांनुसार, ही बाब गोकुळ गीते यांच्या जिव्हारी लागल्याने त्यांनी निवडणुकीतून माघार न घेण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. मात्र, याबाबत अधिकृत स्तरावर कोणतीही स्पष्ट प्रतिक्रिया समोर आलेली नाही.



दैनिक
जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
। शुक्रवार, दि. ५ जून २०२६ ।



# लोकनेता



गुलाबराव पाटील वाढदिवस विशेषांक!



# प्रकाशदायी वाटचालीचे कार्यसंचित:
# जनसेवा, संतसेवा आणि विकासाचा अखंड प्रवास



राजकारणात अनेक नेते येतात, पदे मिळवतात आणि काळाच्या ओघात विस्मृतीत जातात. मात्र काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांचे कार्य, त्यांची लोकांप्रती असलेली बांधिलकी आणि समाजासाठीची तळमळ त्यांना सामान्य राजकारण्यांच्या पलीकडे नेऊन ठेवते. जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील हे असेच एक लोकनेते आहेत. त्यांच्या षष्ट्यब्दी निमित्ताने त्यांच्या कार्याचा आढावा घेताना संघर्ष, समाजसेवा, अध्यात्म, विकासदृष्टी आणि जनसामान्यांशी असलेली नाळ या सर्व पैलूंचा उल्लेख अपरिहार्य ठरतो. पांढऱ्या शुभ्र पोशाखात, डोक्यावर टोपी, कपाळी अष्टगंध-बुक्का, गळ्यात तुळशीमाळा आणि मुखी अखंड 'रामकृष्णहरी'चा जप करत हजारो वारकऱ्यांसोबत पंढरपूरच्या दिशेने निघालेली त्यांची प्रतिमा आजही अनेकांच्या स्मरणात ताजी आहे. जळगाव ग्रामीण भागातील जवळपास तीन हजार वारकऱ्यांना तब्बल ५५ बसेसच्या माध्यमातून पंढरपूर वारीसाठी पाठविण्याचा उपक्रम हा केवळ धार्मिक आयोजन नव्हता, तर समाजातील श्रद्धा, संस्कार आणि अध्यात्म जपण्याचा एक अनोखा प्रयत्न होता. मंत्रीपदाच्या जबाबदाऱ्या सांभाळतानाही संतपरंपरेशी असलेली त्यांची नाळ कायम राहिली आहे. संतवचनातील "बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाउले" या उक्तीचा प्रत्यय त्यांच्या जीवनातून वारंवार येतो. गुलाबराव पाटील यांचा प्रवास हा कोणत्याही राजकीय वारशातून किंवा संपन्न पार्श्वभूमीतून सुरू झालेला नाही. ग्रामीण मातीत वाढलेल्या या तरुणाने संघर्षाला सामोरे जात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. शेतकरी, कष्टकरी, कामगार आणि सर्वसामान्यांच्या समस्या त्यांनी जवळून अनुभवल्या. त्यामुळे त्यांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू नेहमीच सामान्य माणूस राहिला. समाजातील वंचित, दुर्बल आणि गरजू घटकांसाठी काम करण्याची प्रेरणा त्यांना त्यांच्या जीवनानुभवातून मिळाली. राजकारणात अनेकदा सत्तेला महत्त्व दिले जाते; परंतु गुलाबराव पाटील यांच्यासाठी सत्ता हे साधन आहे, साध्य नाही. जनतेच्या प्रश्नांचे निराकरण करणे, विकासकामांना गती देणे आणि प्रशासन जनतेच्या दारात नेणे ही त्यांची कार्यशैली राहिली आहे. म्हणूनच ते केवळ मंत्री म्हणून नव्हे, तर "आपला माणूस" म्हणून ओळखले जातात. अडचणीत सापडलेल्या नागरिकाला आधार देणे, त्याच्या समस्या ऐकून घेणे आणि त्यावर उपाय शोधणे ही त्यांची वैशिष्ट्यपूर्ण कार्यपद्धती आहे. पाळधी या आपल्या गावाविषयी त्यांना असलेले प्रेम आणि आत्मीयता विशेष उल्लेखनीय आहे. गावाचा विकास, धार्मिक-सांस्कृतिक परंपरांचे जतन आणि सामाजिक सलोखा यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. गावाशी असलेली त्यांची नाळ आजही तितकीच घट्ट आहे. आपल्या जन्मभूमीबद्दलची ही बांधिलकी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील संवेदनशीलता अधोरेखित करते. राज्याचे पाणीपुरवठा मंत्री म्हणून काम करताना त्यांनी ग्रामीण भागातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी विशेष लक्ष केंद्रित केले. महाराष्ट्रातील अनेक गावांना सुरक्षित आणि शाश्वत पाणीपुरवठा मिळावा यासाठी विविध योजनांना गती देण्यात त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली. पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे, ही जाणीव त्यांनी केवळ शब्दांत व्यक्त केली नाही, तर योजनांच्या माध्यमातून ती प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. जलसंधारण, पाणी बचत आणि पाणी व्यवस्थापन याबाबत त्यांची दूरदृष्टी अनेकांना प्रेरणादायी वाटते. कृषी क्षेत्राशी त्यांचे असलेले नातेही तितकेच दृढ आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत ते नेहमीच संवेदनशील राहिले आहेत. शेतीमधील आधुनिक तंत्रज्ञान, सिंचन सुविधा आणि उत्पादनवाढीच्या संधी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत, या भूमिकेतून त्यांनी सातत्याने काम केले. जळगाव जिल्ह्यातील केळी, कापूस, डाळिंब यांसारख्या पिकांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्यासाठी झालेल्या प्रयत्नांबद्दल ते नेहमी अभिमानाने बोलतात. कृषी क्षेत्राच्या प्रगतीत संशोधन, तंत्रज्ञान आणि शेतकऱ्यांची मेहनत यांचा संगम आवश्यक असल्याचे ते मानतात. संतसेवा आणि समाजसेवा हे त्यांच्या कार्याचे आणखी एक महत्त्वाचे अंग आहे. वारकरी संप्रदायासाठी उभारण्यात आलेले भव्य वारकरी भवन असो, भजनी मंडळांना दिलेले साहित्य असो किंवा धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांना दिलेले प्रोत्साहन असो, त्यांच्या कार्यातून अध्यात्म आणि समाजकारणाचा सुंदर मेळ दिसून येतो. समाजात संस्कार, नैतिकता आणि एकोपा टिकून राहावा यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे ते नेहमी सांगतात.

गुलाबराव पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वात मोठा गुण म्हणजे लोकांशी जोडले जाण्याची क्षमता. पद, प्रतिष्ठा आणि अधिकार मिळाल्यानंतरही त्यांनी आपल्या माणुसकीचा त्याग केलेला नाही. सामान्य नागरिक त्यांच्यापर्यंत सहज पोहोचू शकतो, ही भावना आजही जनमानसात आहे. म्हणूनच त्यांच्या सभोवती केवळ राजकीय कार्यकर्त्यांचे नव्हे, तर विविध क्षेत्रांतील लोकांचेही मोठे कुटुंब निर्माण झाले आहे. षष्ट्यब्दीच्या उंबरठ्यावर उभे असताना त्यांच्याकडे अनुभवांची समृद्ध शिदोरी आहे. संघर्षातून घडलेले नेतृत्व, जनतेसाठीची तळमळ, विकासासाठीची धडपड आणि अध्यात्माशी असलेली नाळ यांमुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक व्यापक झाले आहे. त्यांनी मिळवलेला जनाधार हा केवळ राजकीय समीकरणांचा परिणाम नसून जनतेच्या विश्वासाचा आणि प्रेमाचा पुरस्कार आहे. काट्यांमधून उमलणाऱ्या गुलाबाप्रमाणे त्यांनी संघर्षातून स्वतःची स्वतंत्र आणि सन्माननीय ओळख निर्माण केली. महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात त्यांचे नाव आदराने घेतले जाते. समाजहितासाठीची त्यांची बांधिलकी, विकासासाठीची दूरदृष्टी आणि जनतेशी असलेली नाळ यामुळे त्यांची वाटचाल आजही प्रेरणादायी ठरते. त्यांच्या षष्ट्यब्दी निमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि समाजसेवेची अधिकाधिक ऊर्जा लाभो, हीच सदिच्छा. त्यांनी सुरू केलेली विकास, सेवा आणि संस्कारांची ही प्रकाशदायी वाटचाल भविष्यातही अशाच तेजाने उजळत राहो, हीच सर्वांच्या मनातील प्रामाणिक भावना आहे.

**- (अशोक जैन, अध्यक्ष : जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. जळगाव)**

# लोकांच्या मनाशी संवाद साधणारे माध्यम

फार मोठी कला असते. गुलाबराव पाटील यांनी ही कला केवळ आत्मसात केली नाही, तर ती आपल्या कार्यशैलीचा अविभाज्य भाग बनविली आहे. अनेक जण विषय मांडतात, भाषणे करतात; परंतु श्रोत्यांच्या हृदयाला स्पर्श करणारे शब्द फार थोड्यांकडे असतात. गुलाबभाऊंच्या भाषणांमध्ये ही ताकद प्रकर्षाने जाणवते. माझा आणि गुलाबभाऊंचा परिचय जवळपास तीन दशकांपासूनचा आहे. त्यांच्या अनेक नातेवाईकांचे वास्तव्य चोपडा शहर व तालुक्यात असल्यामुळे त्यांचे चोपड्याशी विशेष भावनिक नाते आहे. आजही त्यांच्या बोलण्यात सहजपणे "घाला कपडा, चला चोपडा" हे वाक्य येते. या एका वाक्यातून त्यांचे चोपड्यावरील प्रेम आणि आत्मीयता दिसून येते. सुमारे वीस वर्षांपूर्वीच्या चोपडा नगर परिषद निवडणुकीतील एक प्रसंग आजही आठवतो. अरुणनगर प्रभागातील उमेदवाराच्या प्रचारासाठी ते चोपड्यात आले होते. त्या निवडणुकीत त्यांनी केलेली धावपळ, कार्यकर्त्यांशी साधलेला संवाद, उमेदवाराच्या विजयासाठी घेतलेले परिश्रम आणि केलेले नियोजन पाहून त्यांच्या नेतृत्वगुणांची जाणीव झाली. एखाद्या कार्यकर्त्याच्या यशासाठी स्वतः झोकून देण्याची वृत्ती त्यांच्यात तेव्हाच दिसून आली होती. गुलाबभाऊंचे औपचारिक शिक्षण फार मोठे नसले तरी शब्दांची ताकद, वाक्यरचना, भावनिक मांडणी आणि लोकभाषेतील संवाद यांचा त्यांना विलक्षण अभ्यास आहे.

फार मोठी कला असते. गुलाबराव पाटील यांनी ही कला केवळ आत्मसात केली नाही, तर ती आपल्या कार्यशैलीचा अविभाज्य भाग बनविली आहे. अनेक जण विषय मांडतात, भाषणे करतात; परंतु श्रोत्यांच्या हृदयाला स्पर्श करणारे शब्द फार थोड्यांकडे असतात. गुलाबभाऊंच्या भाषणांमध्ये ही ताकद प्रकर्षाने जाणवते. माझा आणि गुलाबभाऊंचा परिचय जवळपास तीन दशकांपासूनचा आहे. त्यांच्या अनेक नातेवाईकांचे वास्तव्य चोपडा शहर व तालुक्यात असल्यामुळे त्यांचे चोपड्याशी विशेष भावनिक नाते आहे. आजही त्यांच्या बोलण्यात सहजपणे "घाला कपडा, चला चोपडा" हे वाक्य येते. या एका वाक्यातून त्यांचे चोपड्यावरील प्रेम आणि आत्मीयता दिसून येते. सुमारे वीस वर्षांपूर्वीच्या चोपडा नगर परिषद निवडणुकीतील एक प्रसंग आजही आठवतो. अरुणनगर प्रभागातील उमेदवाराच्या प्रचारासाठी ते चोपड्यात आले होते. त्या निवडणुकीत त्यांनी केलेली धावपळ, कार्यकर्त्यांशी साधलेला संवाद, उमेदवाराच्या विजयासाठी घेतलेले परिश्रम आणि केलेले नियोजन पाहून त्यांच्या नेतृत्वगुणांची जाणीव झाली. एखाद्या कार्यकर्त्याच्या यशासाठी स्वतः झोकून देण्याची वृत्ती त्यांच्यात तेव्हाच दिसून आली होती. गुलाबभाऊंचे औपचारिक शिक्षण फार मोठे नसले तरी शब्दांची ताकद, वाक्यरचना, भावनिक मांडणी आणि लोकभाषेतील संवाद यांचा त्यांना विलक्षण अभ्यास आहे. कोणता शब्द कुठे आणि कसा वापरायचा याचे अचूक भान असल्यामुळे त्यांच्या भाषणांना विशेष धार प्राप्त झाली आहे. त्यामुळेच त्यांचे भाषण हे केवळ राजकीय वक्तव्य राहत नाही, तर ते लोकांच्या मनाशी संवाद साधणारे माध्यम बनते. शिवसेनेच्या दसरा मेळाव्याला महाराष्ट्राच्या राजकारणात विशेष स्थान आहे. लाखो शिवसैनिक आणि नागरिक स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे विचार ऐकण्यासाठी उत्सुक असत. अशा प्रतिष्ठित व्यासपीठावर गुलाबराव पाटील यांना भाषणाची संधी मिळाली, ही त्यांच्या वक्तृत्वकौशल्याची मोठी पावती आहे. लाखोंच्या जनसमुदायासमोर उभे राहून विचार मांडण्याचे सामर्थ्य प्रत्येकाकडे नसते. मी विधानसभा अध्यक्ष असताना ते विरोधी पक्षाचे आमदार होते. त्यांच्या स्वभावात आक्रमकता आहे आणि राजकारणात काही प्रमाणात आक्रमकता आवश्यकही असते. मात्र त्यांची आक्रमकता ही केवळ विरोधासाठी विरोध करणारी नव्हती. त्या आक्रमकतेला विधायकतेची जोड होती. प्रश्न उपस्थित करताना ते अभ्यासपूर्ण भूमिका मांडत आणि जनहिताचा मुद्दा ठामपणे मांडत असत. १९९२-९३ मध्ये हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी "मंत्र्यांच्या गाड्या अडवा" असा आदेश दिला होता. त्यावेळी पाळधी येथे गुलाबभाऊंनी माझी गाडी अडवली होती. वयाने तरुण असलेल्या या कार्यकर्त्याच्या डोळ्यांत नेतृत्वाप्रती असलेली निष्ठा आणि आंदोलनाची जिद्द स्पष्ट दिसत होती. मात्र आमच्यातील संवादामुळे तो संघर्ष मैत्रीत बदलला. त्यावेळी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रामाणिकपणा आणि नेतृत्वाप्रती असलेली निष्ठा प्रकर्षाने जाणवली. विधानसभेत विरोधी पक्षाच्या आमदार म्हणून त्यांनी अत्यंत प्रभावी भूमिका बजावली. विरोधी बाकांवर बसून सरकारला जाब विचारण्याची जबाबदारी त्यांनी समर्थपणे पार पाडली. प्रश्न किती ताणायचा आणि कुठे थांबायचे याचे भान त्यांना होते. अनेकदा त्यांनी आक्रमक भाष्य केले, परंतु सभागृहाची मर्यादा कायम राखली. त्यामुळे त्यांना कधीही विधानसभेबाहेर काढण्याची वेळ आली नाही, हे त्यांच्या संसदीय आचरणाचे द्योतक आहे. राजकारण हा सतत बदलणारा प्रवाह आहे. या प्रवाहात त्यांनी राज्यमंत्री म्हणून आणि त्यानंतर दोन वेळा कॅबिनेट मंत्री म्हणून जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. मंत्री म्हणून त्यांनी केवळ सरकारी निधीवर अवलंबून न राहता विविध माध्यमांतून विकासासाठी संसाधने उपलब्ध करून दिली. जिल्ह्याच्या विकासासाठी सीएसआर निधीचा प्रभावी वापर करणे ही त्यांच्या कार्यशैलीतील विशेष बाब ठरली. गिरणा कालव्याच्या कामासाठी ते अनेकदा माझ्याकडे येत असत. ते स्पष्टपणे सांगत, "तुम्ही विधानसभेचे अध्यक्ष आहात, एका पक्षाचे सदस्य नाही. माझ्या मतदारसंघासाठी निधी मिळवून दिला पाहिजे." या एका वाक्यातून त्यांच्या मतदारसंघाविषयीची तळमळ आणि विकासासाठीची बांधिलकी दिसून येते. "राजकारणात संवाद संपला की लोकशाही संपते" असे म्हटले जाते. गुलाबभाऊंच्या राजकारणात संवादाला विशेष स्थान आहे. ते सर्व स्तरांतील लोकांना ऐकून घेतात, त्यांच्या भावना समजून घेतात आणि विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन जाण्याचा प्रयत्न करतात. आजच्या राजकारणात "आर्ट ऑफ लिसनिंग" म्हणजेच ऐकून घेण्याची कला दुर्मिळ होत चालली आहे; परंतु गुलाबभाऊंनी हा गुण जपला आहे. राजकीय नेतृत्वाने जात, धर्म, पंथ आणि वर्ग यांच्या सीमांच्या पलीकडे जाऊन काम केले पाहिजे. समाजातील प्रत्येक घटकाला आपले मानले पाहिजे. गुलाबराव पाटील यांच्या कार्यात हा सर्वसमावेशक दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून येतो. म्हणूनच विविध विचारसरणीचे आणि विविध पक्षांचे लोकही त्यांच्या कार्याचा आदर करतात. १९७४ पासून सार्वजनिक जीवनात कार्यरत असताना मी अनेक नेत्यांना जवळून पाहिले आहे. माझी विचारधारा वेगळी आणि गुलाबभाऊंची वेगळी असली तरी चांगल्या कार्याचा गौरव व्हायलाच हवा, अशी माझी भूमिका आहे. लोकशाहीची खरी ताकद ही याच परस्पर सन्मानात आहे गुलाबराव पाटील यांचा आतापर्यंतचा प्रवास हा संघर्ष, संवाद, विकास आणि जनसेवा यांचा सुंदर संगम आहे. त्यांच्या षष्ट्यब्दी निमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि समाजसेवेची अधिक ऊर्जा लाभो, हीच सदिच्छा. "हर उगता हुआ सूरज नई रोशनी दे आपको,
हर खिलता हुआ फूल खुशबू दे आपको।
हम तो कुछ देने के काबिल नहीं हैं,
उपरवाला ज्यादा उम्र दे आपको...

**— अरुणभाई गुजराथी**
**माजी अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा**





दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33-0714843
। शुक्रवार, दि. ५ जून २०२६ ।
लोकनेता
8
गुलाबराव पाटील वाढदिवस विशेषांक!

# ३५ वर्षांच्या सेवेला सलाम! कळमसरे ग्रामपंचायतीत ज्ञानेश्वर पाटील यांचा सेवापूर्ती सत्कार उत्साहात

## ग्रामस्थांच्या प्रेमाने भारावले निवृत्त ग्रामपंचायत अधिकारी; "हा सन्मान माझ्या कामाची खरी पावती" – ज्ञानेश्वर पाटील

जन सम्राट टाईम्स

**अमळनेर । प्रतिनिधी :** अमळनेर तालुक्यातील कळमसरे ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी ज्ञानेश्वर पाटील यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित सेवापूर्ती सत्कार सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. तब्बल ३५ वर्षे शासकीय सेवेत कार्यरत राहिल्यानंतर ३१ मे २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या पाटील यांचा ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत सपत्नीक गौरव करण्यात आला. कळमसरे ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात झालेल्या या सोहळ्याला ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या लाडक्या अधिकाऱ्याविषयीचा स्नेह आणि आदर व्यक्त केला. यावेळी ज्ञानेश्वर पाटील आणि त्यांच्या पत्नी उषा पाटील यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला सरपंच जगदीश निकम, उपसरपंच जितेंद्रसिंग पाटील, ग्रामपंचायत सदस्य प्रमिलाबाई चौधरी, मिनाबाई कुंभार, दिनकर चव्हाण, देविदास बडगुजर, मंगल भिल, हेमंत चौधरी यांच्यासह ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे पदाधिकारी, विकास सोसायटीचे सदस्य, महसूल विभागातील अधिकारी-कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, महिला बचत गटांच्या प्रतिनिधी, पत्रकार आणि



ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच कार्यक्रमात कळमसरे ग्रामपंचायतीत नव्याने नियुक्त झालेले ग्रामपंचायत अधिकारी नितीन भूपेंद्रसिंग पाटील यांचेही स्वागत व सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांनी त्यांचे स्वागत करत नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे तालुकाध्यक्ष संजय पाटील होते. तर संघटनेचे सचिव नितीन पाटील आणि देविदास माळी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आपल्या मनोगतात ज्ञानेश्वर पाटील यांनी कळमसरे ग्रामस्थांनी दिलेल्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना भावना व्यक्त केल्या. "संपूर्ण गावाने माझा जो भव्य सत्कार केला, ती माझ्या आयुष्यभराच्या कामाची खरी पावती आहे. ३५ वर्षांच्या सेवाकाळात अनेक ठिकाणी काम करण्याची संधी मिळाली; मात्र एवढा आत्मीयतेचा आणि प्रेमाचा सन्मान मला कुठेही मिळाला नव्हता. कळमसरे गावाने मला कुटुंबातील सदस्याप्रमाणे जपले. या प्रेमामुळे मी संपूर्ण गावाचा कायम ऋणी राहीन," असे ते भावूक स्वरात म्हणाले. अध्यक्षीय भाषणात संजय पाटील यांनी ज्ञानेश्वर पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, एखाद्या ग्रामपंचायत अधिकाऱ्याचा इतक्या मोठ्या प्रमाणावर आणि ग्रामस्थांच्या सहभागातून सत्कार होणे ही दुर्मिळ बाब आहे. यावरून त्यांनी गावाच्या विकासासाठी केलेले कार्य, लोकांशी ठेवलेला जिव्हाळा आणि निर्माण केलेला विश्वास स्पष्ट दिसून येतो. कार्यक्रमात सचिव नितीन पाटील, ग्रामस्थ किसनसिंग राजपूत, निवृत्त प्राचार्य जे. वाय. कुंभार, दस्तगीर पिंजारी, उषा पाटील तसेच नव्याने नियुक्त झालेले ग्रामपंचायत अधिकारी नितीन भूपेंद्रसिंग पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. सर्व वक्त्यांनी ज्ञानेश्वर पाटील यांच्या प्रामाणिक, पारदर्शक आणि लोकाभिमुख कार्यशैलीचे कौतुक करत त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे संपूर्ण कार्यक्रमाला विशेष ऊर्जादायी वातावरण लाभले. सूत्रसंचालन प्रा. हिरालाल पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भागवत कोळी,प्रदीप महाजन, योगेंद्र पाटील, गुलाब वडर, बुधा वडर तसेच ग्रामपंचायतीच्या सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कळमसरे ग्रामपंचायतीत पार पडलेला हा सेवापूर्ती सत्कार सोहळा ग्रामविकासासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या एका कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याविषयीचा कृतज्ञतेचा भाव व्यक्त करणारा संस्मरणीय सोहळा ठरला.




# केळी पंचनाम्यातील त्रुटींवर राष्ट्रवादी काँग्रेसचा एल्गार

## अन्याय सहन केला जाणार नाही; फेरपंचनामे न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

जन सम्राट टाईम्स

**यावल। प्रतिनिधी :** तालुक्यात नुकत्याच झालेल्या अवकाळी पाऊस,वादळी वारे आणि प्रतिकूल हवामानामुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मात्र या नुकसानीच्या पंचनाम्यांमध्ये गंभीर त्रुटी असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पंचनाम्यांची तात्काळ फेरतपासणी करून त्यांना न्याय द्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा पक्षाने दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रावेर लोकसभा जिल्हाध्यक्ष उमेश नेमाडे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करून प्रशासनाचे लक्ष वेधले. यावेळी केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानीच्या पंचनाम्यात अनेक गंभीर त्रुटी असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. निवेदनात




नमूद करण्यात आले आहे की, अनेक शेतकऱ्यांच्या अहवालामध्ये लागवड क्षेत्र प्रत्यक्षापेक्षा कमी दाखविण्यात आले आहे.

काही ठिकाणी चुकीचे गट क्रमांक नमूद करण्यात आले असून अनेक पंचनाम्यांमध्ये अपूर्ण माहितीची नोंद करण्यात आली आहे. तसेच प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानीची सखोल पाहणी न करताच पंचनामे पूर्ण करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, केळी हे अत्यंत खर्चिक पीक असून शेतकऱ्यांनी मोठी आर्थिक गुंतवणूक करून लागवड केली आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे हजारो एकरांवरील केळी बागांचे मोठे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत पंचनाम्यातील त्रुटी कायम राहिल्यास अनेक पात्र शेतकरी शासनाच्या नुकसानभरपाईपासून तसेच पीक विमा योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची भीती आहे.

शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी प्रशासनाने सर्व पंचनाम्यांची विशेष तपासणी करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. ७/१२ उतारे, पीक विमा नोंदी आणि महसुली अभिलेखांच्या आधारे वस्तुनिष्ठ पडताळणी करून प्रत्यक्ष नुकसानाची अचूक नोंद घ्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

चुकीचे पंचनामे तातडीने दुरुस्त करून नव्याने फेरपंचनामे करण्यात यावेत आणि कोणत्याही पात्र शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही याची दक्षता प्रशासनाने घ्यावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावल तालुक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून संघर्ष करण्यास तयार असल्याचे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही आणि त्वरित कार्यवाही केली नाही, तर व्यापक जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या प्रसंगी रावेर लोकसभा जिल्हाध्यक्ष उमेश नेमाडे, जिल्हा सरचिटणीस विवेक ठाकरे, भुसावळ तालुकाध्यक्ष विलास पाटील, शहराध्यक्ष संतोष चौधरी, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष राकेश सोनार, ॲड. देवकांत बाजीराव पाटील, युवती जिल्हाध्यक्षा भाग्यश्री ठाकरे, भुसावळ नगरसेवक निलेश कोलते, अक्षय बोरोले यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. नुकसानग्रस्त केळी उत्पादकांना योग्य नुकसानभरपाई, विमा संरक्षण आणि न्याय मिळवून देण्यासाठी पक्षाचा लढा सुरूच राहणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. प्रशासनाने शेतकऱ्यांच्या भावना लक्षात घेऊन पंचनाम्यातील त्रुटी तातडीने दूर कराव्यात, अशी मागणी यावेळी पुन्हा करण्यात आली.

# जळगावात जुगार अड्डयांवर पोलिसांचा धडक प्रहार; ४ ठिकाणी छापे, ८ जण ताब्यात

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी :** जळगाव शहरात छुप्या पद्धतीने सुरू असलेल्या अवैध जुगार आणि मटका व्यवसायावर पोलिसांनी मोठा घाव घालत एकाच दिवशी चार ठिकाणी धडक कारवाई केली. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे आणि प्रोबेशनरी डीवायएसपी प्रशांत दरेकर यांच्या विशेष पथकाने मंगळवारी (२ जून) शहरातील विविध भागांमध्ये छापे टाकून आठ जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत एकूण ३३ हजार ८४० रुपयांची रोकड तसेच मोठ्या प्रमाणावर जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. शहरातील अवैध धंद्यांवर अंकुश ठेवण्यासाठी पोलिसांनी राबविलेल्या या विशेष मोहिमेमुळे जुगार आणि मटका अड्डे चालवणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. गुप्त माहितीच्या आधारे विशेष पथकाने गांधी मार्केट, एमआयडीसी परिसर, आझाद नगर टी-पॉईंट आणि बॉम्बे रेल्वे गेट परिसरात समन्वित पद्धतीने कारवाई केली. गांधी मार्केट परिसरात सुरू असलेल्या कल्याण मटका अड्डयावर पोलिसांनी छापा टाकून नंदलाल गणपत बुरुजवाले (वय ५६) आणि अशोक गोपाळ महाजन (वय ४९) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून २ हजार ६८० रुपयांची रोकड, मटक्याच्या स्लिप, कार्बन पेपर आणि पेन जप्त करण्यात आले. एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुप्रीम कॉलनीसमोरील टपरीच्या आड सुरू असलेल्या वरली मेनबाजार सट्टा अड्डयावर पोलिसांनी सर्वात मोठी कारवाई केली. या ठिकाणी रहीम मेहताब तडवी, निलेश लक्ष्मण सोनार, आशिक शाहा शहादत शाहा आणि दिपक राजेंद्र सोनार या चौघांना रंगेहात पकडण्यात आले.




